REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 6 | MARCH - 2018

# ‘महाराष्ट्रातील जिल्हा नियोजन’

आप्पासो मच्छिंद्र काळेल[१] , प्रा.डॉ.एस.डब्ल्यु.मिसाळ[२]
[१] संशोधक , आबासाहेब गरवारे कॉलेज, पुणे.
[२]मार्गदर्शक , सहयोगी प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग , अनंतराव थोपटे कॉलेज, भोर, पुणे.

## प्रस्तावना



जगामध्ये आर्थिक नियोजनाचा अवलंब सर्वप्रथम रशियाने सन १९२८ मध्ये केला. भारतामध्ये नियोजित आर्थिक विकासाची सुरुवात १९५१ मध्ये पहिल्या पंचवार्षिक योजनेने झाली. १५ मार्च १९५० रोजी नियोजन आयोगाची स्थापना केली व काही उद्दिष्टे समोर ठेऊन प्रत्यक्ष नियोजन १ एप्रिल १९५१ पासून सुरु केले. १ एप्रिल ते ३१ मार्च हे भारतामध्ये आर्थिक वर्ष म्हणुन ओळखले जाते. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली तेव्हा पासून महाराष्ट्रात राज्य पातळीवर राज्य नियोजन मंडळाकडून नियोजन केले जाते. याच वेळी सरकारने जिल्ह्या जिल्ह्यातील प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी जिल्हा पातळीवर संतुलित विकासाचे धोरण स्विकारुन ते पंचवार्षिक योजना व वार्षिक योजनेच्या स्वरुपात लागू केले.

महाराष्ट्रात जिल्हा पातळीवर आर्थिक नियोजनाची खऱ्या अर्थाने सन १९७४ ७५ मध्ये झाली व जिल्हा हा नियोजनाचा प्राथमिक घटक म्हणुन त्यास मान्यता मिळाली. भारतीय राज्य घटनेच्या ७४ व्या घटना दुरुस्तीमधील अनुच्छेद २४३ Z (d) नुसार महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा नियोजन समितीची स्थापना करण्यात आली. त्याच वेळी नियोजनाची काही उद्दिष्ट्ये समोर ठेवण्यात आली ती उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) जिल्ह्यांतर्गत क्षेत्रीय असमानता कमी करणे.
२) उपलब्ध साधनसामग्रीचा पर्याप्त वापर करणे.
३) विकासात्मक नियोजनामध्ये जनतेचा सहभाग वाढविणे.

वरील उद्दिष्ट्ये समोर ठेऊन जिल्हा नियोजनाद्वारे स्थानिक पातळीवरील उपलब्ध जमिन, पाणी, जंगले इत्यादी नैसर्गिक साधन संपत्तीचा पुरेपूर उपयोग करणे तसेच इतर साधने उदा. मनुष्यबळ, भांडवल, वित्तीयसाधने इत्यादीचा वापर करुन जिल्ह्याचा क्षेत्रीय विकास घटवून आणणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट या समितीपुढे आहे.

## संशोधनाचे उद्दिष्ट्ये :

१) जिल्हा नियोजनाची संकल्पना जाणून घेणे.
२) जिल्ह्याच्या आर्थिक विकासातील जिल्हा नियोजनाची भूमिका अभ्यासणे.
३) जिल्हा नियोजनाची नियोजन यंत्रणा, नियोजनप्रक्रिया आणि नियोजनाची रणनिती याचा अभ्यास करणे.
४) जिल्ह्याच्या संतुलित क्षेत्रीय विकास घडवून आणण्यामध्ये जिल्हा नियोजनाच्या भूमिकेचे मूल्यमापन करणे.

**संशोधनाची गृहिते :**

१) जिल्हा नियोजनामुळे जिल्ह्याचा संतुलित आर्थिक विकास होत आहे.

२) जिल्ह्यातील उपलब्ध साधनसामग्रीचा पर्याप्त वापर होत आहे.

**संशोधन पध्दती :**

संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्रोताचा वापर करुन माहिती मिळविली आहे.

**१) प्राथमिक स्रोत :**

प्रश्नावली व मुलाखतीद्वारे माहितीचे संकलन केले आहे.

**२) द्वितीय स्रोत :**

यामध्ये महाराष्ट्राचे आर्थिक पहाणी अहवाल, पुणे जिल्ह्याचे आर्थिक व सामाजिक पहाणी अहवाल, वर्तमानपत्रातील विविध लेख, विविध नियतकालिके, विविध मासिके, संदर्भ पुस्तके, संशोधन प्रबंध, विविध वेबसाईट्स, यशवंतराव चव्हाण विकास व प्रशासन प्रबोधिनी (यशदा, पुणे), भारतीय सांख्यिकीय विभागाचा अहवाल, अर्थसंवाद गोखले इन्स्टिट्युट, पुणे, भारतीय शिक्षण संस्था, आबासाहेब गरवारे कॉलेजचे ग्रंथालय, पुणे विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे ग्रंथालय इत्यादी साधनांचा वापर या संशोधनासाठी केला आहे.

**जिल्हा नियोजन :**

नियोजनाचे विकेंद्रिकरण करताना जिल्हा हा नियोजनाचा घटक म्हणून स्विकारला जाणे स्वाभाविक आहे. जिल्ह्याचा समतोल विकास साधने हा जिल्हा नियोजनाचा मुख्य उद्देश आहे. म्हणुनच जिल्हा नियोजन हे स्थानिक गरजांच्या पुर्णतेचे आणि सामाजिक विकासाचे साधन आहे. व्ही.के.आर.व्ही.राव यांच्या मते जिल्हा नियोजन ही जिल्ह्याचे भौगोलिक क्षे व साधन संपत्तीच्या विकासाची प्रभावी यंत्रण आहे. जिल्हा नियोजन सत्तेच्या विकेंद्रिकरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

**जिल्हा नियोजन समिती :**

महाराष्ट्र शासनाच्या ४ ते २००० च्या सुधारित अधिसूचनेनुसार जिल्हा नियोजन समिती गठीत केली जाते. या समितीची सदस्य संख्या जिल्ह्याच्या लोकसंख्येवर अवलंबून असते. जिल्ह्याची लोकसंख्या २० लाखापर्यंत असेल तर सदस्य संख्या ३०, लोकसंख्या २० ते ३० लाखापर्यंत असेल तर सदस्य संख्या ४० इतकी असते आणि जिल्ह्याची लोकसंख्या ३० लाखापेक्षा जास्त असेल तर सदस्य संख्या ५० असते.

**जिल्हा नियोजनातील प्रमुख घटक :**

जिल्ह्याच्या आर्थिक नियोजनात पुढील घटकांचा समावेश होतो.

१) कृषि व संलग्न सेवा, २) ग्रामीण विकास, ३) पाटबंधारे व पुर नियंत्रण, ४) ऊर्जा, ५) उद्योग व खाणकाम, ६) परिवाहन, ७) सामान्य आर्थिक सेवा, ८) सामाजिक सामुहिक सेवा, ९) एकूण सामन्य सेवा.

वरील घटक नियोजनामधील प्रमुख मानून यांच्या विकासासाठी पंचवार्षिक योजना व वार्षिक या स्वरुपात नियोजन करुन या घटकांना विशिष्ट अशी खर्चासाठीची तरतुद केली जाते.

**जिल्हा नियोजनाला दिल्या जाणाऱ्या मदतीचा निकष :**

जिल्ह्याच्या आर्थिक नियोजनासाठी जिल्ह्याला खालील निकषावर आधारीत मदत केली जाते.

**जिल्हा नियोजनाला दिल्या जाणाऱ्या मदतीचा निकष**

**तक्ता क्र. १**

| अ.क्र. | निकष | टक्केवारी |
|---|---|---|
| १. | एकूण लोकसंख्या | ६० |
| २. | शहरी लोकसंख्या | ०५ |
| ३. | अनुसुचित जाती व जमातीची लोसंख्या | ०५ |
| ४. | कृषि क्षेत्रातील अनुशेष | ०५ |
| ५. | पाटबंधारे क्षेत्रातील अनुशेष | ०४ |
| ६. | उद्योग क्षेत्रातील अनुशेष | ०५ |
| ७. | वाहतुक क्षेत्रातील अनुशेष | ०५ |
| ८. | अवर्षण प्रवण क्षेत्रातील विशेष समस्या | ०३ |
| ९. | किनारपट्टीच्या विशेष समस्या | १.५ |
| १०. | वनखात्याच्या विशेष समस्या | १.५ |
| ११. | राज्य सरकारच्या विशेष अडचणीसाठी राखीव निधी | ०५ |
| | **एकूण** | **१००** |

**संदर्भ :** अर्थसंवाद २००६, जानेवारी मार्च खंड २९, अंक ४ पृ. क्र. ३५३

वरील तक्ता क्र. १ नुसार प्रत्येक जिल्ह्याला दिली जाणारी मदत ही लोकसंख्येच्या निकषावरुन सर्वात जास्त म्हणजे ६०% निधी मिळतो. तर अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्या ५%, कृषि क्षेत्रातील अनुशेषासाठी ५%, पाटबंधारे क्षेत्रातील अनुशेषासाठी ४%, उद्योग क्षेत्रातील अनुशेषासाठी ५%, वाहतुक क्षेत्रातील अनुशेषासाठी ५%, तर अवर्षण प्रवण क्षेत्रातील विशेष समस्येसाठी ३%, किनारपट्टीच्या विशेष समस्येसाठी १.५%, वनखात्याच्या विशेष समस्यासाठी १.५% आणि राज्य सरकारच्या विशेष अडचणीसाठी राखीव निधी म्हणुन ५% राखून ठेवण्यात येतो. निधी वाटपासाठी गाडगीळ सूत्र उपयोगात आणले जाते. यासाठभ् आजही १९७१ च्या जनगणनेचा आधार घेतला जातो. त्याऐवजी विद्यमान जनगणनेचा आधार घेतला पाहिजे.

## जिल्हा नियोजनाचे दोष व उपाय :

जिल्हा नियोजनात अनेक दोष आहेत. ते दूर झाले पाहिजेत. जिल्हा नियोजन समिती केंद्र व राज्य सरकारच्या अग्रक्रमांच्या योजनासाठी असलेल्या तरतुदीच्या आधारावर जिल्हा नियोजन करीत असल्यामुळे स्थानिक उत्पादन घटक व स्थानिक गरजांच्या अग्रक्रमाकडे दुर्लक्ष होते.

जिल्हा नियोजन अधिक यशस्वी होण्यासाठी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी व जिल्हा नियोजन समितीमधील अधिकारी वर्ग यांनी आपल्या कार्यक्षमतेचा पुरेपुर उपयोग करुन सामान्य जनतेला नियोजनाचे लाभ मिळवून देण्यासाठी कार्यरत राहिले पाहिजे. तर जिल्हा नियोजन ग्रामीण व शहरी जनतेचे महत्तम कल्याण साध्य करु शकेल.

## समारोप :

जिल्हा नियोजन हे क्षेत्रीय असमानता कमी करण्यासाठी केले जाते. जिल्ह्या जिल्ह्यातील असमानता कमी करण्यासाठी जिल्हा नियोजन महत्वाची भूमिका पार पाडताना दिसून येते. जिल्हा नियोजन समिती प्रादेशिक समतोल साधण्याचा प्रयत्न करत असते. परंतु राज्यस्तरीय कार्यक्रमांतर्गत जिल्हा निहाय निधी वितरणात काही जिल्ह्यांना अधिक निधी दिला जातो. त्यामुळे प्रादेशिक असमतोल वाढतो. म्हणुन निधी वाटपाचे कालबाह्य झालेले सूत्र बदलणे आवश्यक आहे. जिल्ह्याचा भौगोलिक क्षेत्राचा विचार, निधी

वाटप करताना झाला पाहिजे. जिल्हा नियोजनातील दोष दूर करुन जिल्हा नियोजनाची अंमलबजावणी झाली तर समतोल आर्थिक विकास साध्य करता येईल.

**संदर्भ :**

१) दत्त व सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था एस.चंद प्रकाशन, नवी दिल्ली २०११ २०१२.
२) पत्की अशोक (२०००) विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ.क्र. १९० ते १९८.
३) कुरुलकर र.पु. (जुलै सप्टेबर २००२), ७३ वी घटना दुरुस्ती आणि विकेंद्रीत नियोज, अर्थसंवाद, खंड २६, अंक २.
४) रामदास य.माहोर, महाराष्ट्रातील जिल्हा नियोजन, अर्थसंवाद (२००६ जानेवारी मार्च) खंड ९, अंक ४, पृ.क्र. ३५१ ते ३५६.
५) श्री. आ.देशपांडे (जानेवारी मार्च) महाराष्ट्रातील जिल्हा नियोजन, अर्थसंवाद, खंड २८, अंक ४.
६) जिल्हा नियोजन समिती, पुणे जिल्हा, जिल्हा वार्षिक योजना माहिती पुस्तिका २०१४ १५